

# वक्ता दशसहस्त्रेषु

डॉ. नी. र. वऱ्हाडपांडे

'शतेषु लभ्येत वीरः, सहस्रेषुच पंडितः, वक्ता दशसहस्रेषु, दाता भवति वानवा, 'म्हणजे शंभरात एखादाच शूर असतो, हजारात एखादाच पंडित असतो, दहा हजारात एखादाच वक्ता असतो, पण दाता कितीही हजार धुंडाळले तरी सापडेलच असे नाही' असे सुभाषित आहे. या सुभाषितानुसार राम शेवाळकर हे दहा हजारातील एक विरळ असे व्यक्तिमत्त्व आहे. अलीकडे वक्तृत्वाबद्दल पश्चिम महाराष्ट्रात ज्यांची प्रसिद्धी झाली अशा वैदर्भीय वक्त्यांपैकी बाळशास्त्री हरदास व प्राचार्य राम शेवाळकर हे प्रमुख आहेत. राम शेवाळकरांना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देखील लाभले व त्यामुळे त्यांच्या वक्तृत्वाचा प्रभाव अधिक पसरण्यास मदत झाली.

माझी मुलगी हिंदीमध्ये कविता व लघुकथा लिहिते. तिच्या कथांना महाराष्ट्र सरकारच्या हिंदी अकादमीने नुकतेच अनुदान दिले व त्याच्या सहाय्याने तिचा 'सुगंध' हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. हे प्रकाशन श्री राम शेवाळकर यांच्या हस्ते झाले. त्यांनी हे प्रकाशन करावे म्हणून मी त्यांना आंमत्रण देण्यास गेलो. राम शेवाळकरांनी आनंदाने माझे स्वागत केले व आढेवेढे न घेता या आमंत्रणाचा स्विकार केला. मी त्यांना माझे नुकतेच प्रसिद्ध झालेले 'सत्तावनचा स्वातंत्र्यसंग्रामं आणि त्याचे निंदक' हे पुस्तक भेट म्हणून दिले तेव्हा त्यांनी परतभेटीदाखल आपली 'कालिदासाची यक्षसृष्टी' व 'द्वादशी' ही दोन पुस्तके दिली.

प्राचार्य राम शेवाळकर ठरल्याप्रमाणे 'सुगंध' या कथासंग्रहाच्या प्रकाशनासाठी वेळेवर हजर झाले व त्यांनी प्रारंभी हिंदीमध्ये व नंतर नेहमीप्रमाणे मराठीत भाषण केले.

या भाषणात शेवाळकरांच्या भाषणाचे नेहमीचे गुण तर होतेच पण शिवाय ज्या पुस्तकाचे प्रकाशन करायचे त्याचे त्यांनी सूक्ष्म वाचन केल्याचे आढळून आले. बहुधा प्रकाशनासाठी बोलावण्यात आलेले वक्ते प्रथितयश असतात व त्यांना ज्याचे प्रकाशन करायचे ते पुस्तक वाचायला वेळ असतोच असे नाही. प्रकाशन प्रसंगीची पुष्कळशी भाषणे पुस्तक वरवर चाळून केलेली असतात. पण शेवाळकरांचे प्रस्तुत भाषण या तऱ्हेचे नव्हते. या भाषणाने वक्ते शेवाळकर कसे आहेत याच्या जोडीला समीक्षक शेवाळकर कसे आहेत याचाही मला अनुभव आला.

शेवाळकर म्हणाले. 'सुगंध' या कथासंग्रहातील साऱ्याच कथा लेखिकेच्या अनुभवातून उद्भवलेल्या आहेत याचा प्रत्यय येतो. सर्वस्वी कल्पनेतून साकार झालेली यात एकही कथा नाही.

लेखिकेचे वास्तव्य मुख्यत: दिल्ली व मुंबई येथेच झाले आहे. तिची पात्रे या दोन शहरातच वावरत असतात यावरून दिसून येते. कौटुंबिक संबंधातील मनोभावनांची गुंतागुंत लेखिकेने रसाळ रीतीने वर्णिलेली आहेत.

शेवाळकरांचे हे भाषण ऐकून त्यांनी दिलेली दोन समीक्षात्मक पुस्तके वाचण्याची मला इच्छा झाली. यापैकी 'कालिदासाची यक्षसृष्टि' हा माझा फारच आवडीचा विषय आहे. कालिदासाच्या कविता गुणगुणण्यात माझा बराच वेळ जात असतो. माझ्या सर्व व्यक्तित्त्वात भरून राहलेले कोणते ग्रंथकार आहेत असे मला विचारले तर मी कालिदास व बर्ट्रण्ड रसेल ही दोन नावे घेईन. अगदी भिन्न क्षेत्रातील या दोन ग्रंथकारात काय साम्य आहे? असे कोणी विचारील. त्याचे काहीसे उत्तर शेवाळकरांनी कालिदासाच्या यक्षसृष्टीचे जे दर्शन घडविले आहे त्यावरून येऊ शकेल.

कालिदासाच्या तीन नाटकातील कथानक रचनेचे विवेचन करताना शेवाळकरांनी त्यातील बारीकसारीक घटनांच्याही सप्रयोजनतेकडे व औचित्याकडे लक्ष वेधले आहे.


## प्रतिभा व अनुभव

कालिदासाची कथानकरचना एखाद्या वैज्ञानिक उपपत्तीसारखी निर्दोष असते. असे म्हटल्याबरोबर काही लोक विचारतील, मग कालिदासाच्या कथानकातील शाप आणि स्वर्गात उडणारे रथ यांचे काय ?'

शाप व आकाशगमन या पौराणिक कथानकातील अदभुत

('शतेषु लभ्येत वीरः, सहस्रेषुच पंडितः,वक्ता दशसहस्रेषु, दाता भवति वानवा 'म्हणजे शंभरात एखादाच शूर असतो, हजारात एखादाच पंडित असतो, दहा हजारात एखादाच वक्ता असतो, पण दाता कितीही हजार धुंडाळले तरी सापडेलच असे नाही' असे सुभाषित आहे. या सुभाषितानुसार राम शेवाळकर हे दहा हजारातील एक विरळ असे व्यक्तिमत्त्व आहे. अलीकडे वक्तृत्त्वाबदल पश्चिम महाराष्ट्रात ज्यांची प्रसिद्धी झाली अशा वैदर्भीय वक्त्यांपैकी बाळशास्त्री हरदास व प्राचार्य राम शेवाळकर हे प्रमुख आहेत. राम शेवाळकरांना अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद देखील लाभले व त्यामुळे त्यांच्या वक्तृत्त्वाचा प्रभाव अधिक पसरण्यास मदत झाली.)

गोष्टी गृहीतकृत्यासारख्या आहेत. पौराणिक कथानकात या गोष्टी घडतात असे गृहीत धरायचे आहे. भौतिक उपपत्तीत देखील काही गोष्टी गृहीत धरलेल्या असतात. त्या सिद्ध करता येत नाहीत व त्या गृहीत धरल्याशिवाय सिद्ध करता येण्यासारख्याही पुष्कळशा गोष्टी सिद्ध होत नाहीत, हीच त्यांची तार्किक उपयुक्तता आहे. त्याचप्रमाणे शाकुंतलातील शाप व दुष्यंताचे व शकुंतलेचे स्वर्गगमन गृहीत धरल्याशिवाय धीरोदात्त नायक असूनही दुष्यंत शकुंतलेला विसरतो व दुष्यंत/शकुंतलेची विरहानंतरची दुसरी भेट मारीचाश्रमात होते या गोष्टी घडू शकत नाहीत. अशा अद्‌भुत गोष्टी एकदा गृहीत धरल्यावर कालिदासाच्या बाकीच्या कथानक रचनेत काटेकोर चिकित्सकाला देखील दोष काढण्यासारखे काही आढळणार नाही.



याच्या उलट शेक्स्पीअरची कथानकरचना पहा. हॅम्लेटचा काका त्याच्या बापाचा खून करून राज्य बळकावतो. ही घटना वाचल्याबराबेर किंवा रंगभूमीवर पाहिल्याबरोबर मनात असा प्रश्न उद्‌भवतो की राजा मेल्यावर त्याचे राज्य त्याचा मुलगा जो हॅम्लेट त्याला मिळायला पाहिजे. हॅम्लेटच्या काकाने उघड उघड युद्ध जिंकून व भावाचा उघड वध करून औरंगजेबाप्रमाणे राज्य जिंकले नसते. राजाचा मृत्यु स्वाभाविकपणे झाला असा प्रचार करून त्याने राज्यावर हक्क स्थापिला असतो, हे कसे शक्य आहे ? डेन्मार्कमध्ये बापानंतर मुलाला राज्य न मिळता भावाला राज्य मिळावे अशी चाल होती काय? हॅम्लेट नाटकाचा प्रारंभच असा अप्रत्ययकारक आहे.

याहीपेक्षा जास्त अप्रत्ययकारकता शेक्स्पीअरच्या सुखान्तिकामध्ये वारंवार येतात. प्रेक्षकांनी आपली बुद्धि गहाण ठेवलेली आहे असे मानून कल्पिलेले हे प्रसंग शेक्स्पीअरमध्ये अनेकदा येतात.

बर्ट्रण्ड रसेल व कालिदास यातील ज्या साम्यामुळे मला दोघांचेही लिखाण आवडते ते म्हणजे या दोन्ही लेखकांची वास्तवाशी असलेली बांधिलकी.

शेवाळकरांनी मेघदूताची चर्चा करताना. मेघदूतापेक्षा माधव ज्युलियन् यांचे 'विरहतरंग' श्रेष्ठ आहे असे जे उद्‌गार काढले आहेत त्यांची दखल घेतली आहे. मेघदूतातील विरहभावना काल्पनिक आहे म्हणजे कवीने स्वत: अनुभवलेली नाही, उलट विरहतरंगातली विरहभावना माधव ज्युलियन यांनी स्वत: अनुभवलेली असलीच पाहिजे हे 'प्रचीतीचे बोलणे आहे' असे निःसंदिग्ध रीतीने वाटल्याशिवाय राहत नाही म्हणून 'विरहतरंग' मेघदूतापेक्षा श्रेष्ठ आहे अशा आशयाचे श्री. रा. श्री. जोग यांचे उद्‌गार आहेत. यात हे गृहीत धरलेले आहे की स्वत:च्या भावना व्यक्त करणारे काव्य काल्पनिक व्यक्तीच्या काल्पनिक भावना व्यक्त करणाऱ्या काव्यापेक्षा श्रेष्ठ असते.

हा निकष मन:पूत आहे. स्वत:च्या भावना व्यक्त करणारा कवि केवळ भावगीते लिहू शकेल. 'विरहतरंग' हे दोनशेच्या वर कडव्यांचे खंडकाव्य असले तरी मुळातील लहान सुनीतांना जोडून हे मोठे सुनीत केले आहे. जो कवि फक्त स्वत:च्या भावनाच वर्णन करू शकतो तो महाकाव्य लिहू शकणार नाही. 'रघुवंश' या महाकाव्यात १५/२० राजे व राजकन्या, ऋषि इत्यादिकांच्या भाव भावनांचे वर्णन आहे. असे वर्णन करू शकण्यास कवीमध्ये दुसऱ्याच्या भावना व्यक्त करण्याचे सामर्थ्य असले पाहिजे. हे सामर्थ्य म्हणजे नवनिर्मितीचे सामर्थ्य यालाच आनंदवर्धनाने प्रतिभा म्हटले आहे.

## बहुपत्नीकत्व आणि साहित्य

'विरहतरंग' हे अनुभवज्यन्य काव्य आहे व 'मेघदूत' हे प्रतिभाजन्य काव्य आहे हा मुद्दा शेवाळकरांनी फार समर्थपणे मांडला आहे. मेघदूतातली सारीच सृष्टी काल्पनिक आहे, यक्ष, यक्षिणी, कुबेर व त्यांची अलकानगरी. कवि हे यातले पात्र नाही.

जग निर्मिणाऱ्या ईश्वराप्रमाणे तो आपल्या सृष्टीत कधीही दिसत नाही.

मेघदूतातील प्रेम शारीरिक आहे व विरहतरंगातील मानसिक आहे असा दुसरा मुद्दा आहे. याचा शेवाळकरांवर बराच प्रभाव दिसतो. त्यांना कालिदासाचे दुष्यंत, विक्रम व अग्निमित्र हे तीन्ही नायक शृंगारिक व बहुपत्नीक आहेत याची खंत वाटताना दिसते. कालिदासाने आपल्या राजदरबारीच्या आयुष्यात तसेच नायक पाहिले. भोवताली पाहिलेल्या जगाचेच त्याने दर्शन घडविले यात साहित्याच्या दृष्टीने कोणते न्यून आहे?

शारीरिक व मानसिक प्रेम या भेदाची थोडी अधिक चर्चा केली पाहिजे. दुष्यंत, विक्रम व अग्निमित्र यांचे प्रेम शारीरिक होते असे मानले तर त्यांच्या अंत:पुरात अनेक स्त्रिया असताना शकुंतला, उर्वशी व मालिविकाच पाहिजे असा त्यांचा आग्रह का? यक्षाला आपली पत्नीच पाहिजे होती. रामगिरीत त्याला एखादी दुसरी स्त्री वा वेश्या मिळाली नसती काय? या दुसऱ्या स्त्रिया सौंदर्यामध्ये शकुंतलादिकांच्या तोडीच्या नव्हत्या असे कारण दिले तर शारीरिक प्रेमाचा आक्षेप गळून पडतो. सौंदर्य हा शरीराचा गुणधर्म आहे काय? एखादी स्त्री प्रेमिकाला अप्सरेसारखी दिसते तर इतरांना सामान्य वाटते. त्या स्त्रीचे शरीर दोघांनाही सारखेच दिसत असते. तेव्हा सौंदर्य हा शरीराव्यतिरिक्त असा गुणधर्म आहे.

शारीरिक सौंदर्यावर आधारलेले प्रेम तारुण्य ओसरले की ओसरते, मानसिक प्रेम असे ओसरत नाही म्हणून शारीरिक प्रेमापेक्षा मानसिक प्रेम श्रेष्ठ असे म्हणण्यात येते. पण तारुण्य ओसरले की फक्त शारीरिक सौंदर्यच ओसरते असे नाही. वयोमानाप्रमाणे सगळ्याच शक्ति क्षीण होत असतात, मग त्या शारिरिक असोत की मानसिक असो. विज्ञानाच्या क्षेत्रात वैज्ञानिकांचे सर्वश्रेष्ठ काम तारुण्यातच केलेले असते, कलावंताची सर्वश्रेष्ठ कलाकृति तारूण्यातच निर्मिलेली असते.

कालिदासाचे नायक मुक्तपणे बहुपत्नीक आहेत याची इतर काही टीकाकारांप्रमाणेच शेवाळकरांनाही बरीच खंत वाटते. वस्तुत: अनेक स्त्रियांचे पालनपोषण करण्याचे सामर्थ्य असणाऱ्या पुरुषाला अनेक स्त्रिया असणे आत एका पुरूषाला वा स्त्रीला अनेक अपत्ये असण्यापेक्षा जास्त आक्षेपार्ह असे काही नाही. सवतीमध्ये मत्सर असतो तसा भावंडातही असतो.

बहुपत्नीकत्व आक्षेपार्ह आहे, ती एक कुप्रथा आहे असे मानले तरी नाटकात तिचे चित्रण केल्याने ते नाटक साहित्य या दृष्टीने कमी प्रतीचे ठरते असा आग्रह धरता येणार नाही. तेव्हा बहुपत्नीकत्वाची अनिष्टता हा एक साहित्यबाह्य निकष आहे.

मेघदूतावर श्री. जोग यांचा दुसरा एक आक्षेप असा आहे की, मेघदूतात विरह भावनेच्या वर्णनाइतकेच महत्त्व मेघाच्या मार्गाच्या वर्णनाला दिले आहे. म्हणजे यक्षाला आपला दूत लवकर घरी पोचून आपल्या पत्नीला स्वत:चा निरोप लवकर मिळावा याची घाई नाही. बरे ! कालिदास नुसत्या मार्गाचेच वर्णन करीत नाही तर मार्गात नसलेल्या उज्जयिनीला पाहण्यासाठी तू वाकडी वाट करून जा व वेळ घालव असेही तो मेघाला म्हणतो आहे. तेव्हा यक्षाच्या विरहभावनेत विरहतरंगातील विरहाची आर्थता मुळीच नाही.

### कला व कृत्रिमता

प्रा. जोग येथे विसरतात की विरहतरंगाचा विषयच विरह हा आहे. उलट मेघदूताचा विषय मेघाचे दौत्य हा आहे. येथे विरहाला प्राधान्य असून मेघाच्या दौत्याला प्राधान्य आहे. तेव्हा

वस्तुरचनेच्या बाबतीत काटेकोर असणाऱ्या कालिदासाने दूताने केवळ यक्षावर उपकार म्हणून त्याचा दूत होणे पत्करावे पुरेसे न समजता अलकेपर्यंतचा प्रवास दौत्याची जबाबदारी नसली तरी केवळ प्रवासाची हौस व रम्य स्थळांचे दर्शन यांदृष्टीने देखील करण्यासारखा आहे हे दूताच्या मनावर बिंबविणे आवश्यक मानले. कालिदासाने आपल्या काव्याला यक्षाचे विरहगीत असे नाव न देता मेघदूत असे नाव दिले यातच मार्गाचे वर्णन करणाऱ्या पूर्वमेघाचे औचित्य सिद्ध झाले आहे.

संस्कृत काव्ये कृत्रिम आहेत या पाश्चात्यांच्या आरोपाचा शेवाळकरांच्या मनावर बराच प्रभाव आहे. त्यांनी माघाचे शिशुपालवध व श्रीहर्षाचे नैषधीयचरित ही काव्ये निर्जीव आहेत असा आरोप केला आहे. साहित्यशास्त्राचे नियम, लक्षणे व मूल्ये प्रमाण मानून ही काव्ये रचलेली आहेत म्हणून ती निर्जीव आहेत असा हा युक्तिवाद आहे.

हा युक्तिवाद मानला तर शेवाळकरांना आवडणारे भारवीचे किरातार्जुनीयच केवळ नव्हे. तर कालिदासाची काव्ये देखील निर्जीव ठरतील. कारण साहित्यशास्त्राचा नियमांचे काटेकोर पालन करण्यावर भारवीप्रमाणेच कालिदासाचाही कटाक्ष आहे,

साहित्यशास्त्राच्या नियमांचे काटेकोर पालन हे निर्जीव काव्यनिर्मितीचे कारण मानावयाचे असेल तर हे नियम सौंदर्यपरिपोषास आवश्यक व साहाय्यभूत नाहीत असे सिद्ध व्हायला पाहिजे, असे मुळीच सिद्ध करता येणार नाही. साहित्यशास्त्राने ज्यांची दोषात गणना केली आहे त्या रचनापद्धती रसापकर्षक आहेत म्हणूनच त्यांना दोष म्हणजे उचित आहे व जे साहित्यगुण मानलेले आहेत ते रसपोषक आहेत म्हणूनच गुण या संज्ञेस पात्र झालेले आहेत.

रघुवंशाचा शेवट अग्निवर्ण नावाच्या सदा कामविलासात मग्न राहून प्रजारंजनाकडे मुळीच लक्ष न देणाऱ्या राजाच्या वर्णनाने केला आहे. एका वैभवशाली वंशाची ही शोकांतिका आहे. शोकांतिका संस्कृत साहित्यशास्त्राला वर्ज्य आहे, त्या अर्थी कालिदासाचे हे काव्य अपूर्ण राहिले असावे वा उरलेले उपलब्ध नसावे असा इतर काही विवेचकांप्रमाणेच शेवाळकरांनी निष्कर्ष काढला आहे.

पण हा निष्कर्ष बरोबर नाही. शोकांतिका वर्ज्य आहे ती नाटकात, महाकाव्यात नव्हे. रामायण या महाकाव्याचा शेवट शोकमय आहे. प्राणप्रिय भावाला प्राणदंड द्यावा लागतो व रामाला जलसमाधि घ्यावी लागते. महाभारत महाकाव्याचा अंत देखील शोकपर आहे. अठरा अक्षोहिणींचा संहार होतो व पांडव स्वर्गाचे अधिकारी आहेत की नरकाचे असाच मूलभूत प्रश्न उपस्थित केला जातो. पतनांता: समुच्छ्रया: म्हणजे साऱ्या उत्कर्षाचा शेवट पतनातच आहे या रामायणातील सुभाषिताचे प्रात्यक्षिक म्हणून कालिदासाने बुद्धयाचा रघु व राम यांच्या वैभवशाली वंशाचा शेवट अग्निवर्णात दाखविला आहे.

शेवाळकरांनी दिलेले दुसरे पुस्तक 'द्वादशी' हे आहे. या पुस्तकाला मुख्यत: ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांची चर्चा आहे. ज्ञानेश्वरांच्या बद्दल दुर्दैवाने ऐतिहासिक दृष्ट्या विश्वसनीय अशी काहीच माहिती उपलब्ध नाही. त्यांनी शके १२१२ मध्ये ज्ञानेश्वरी लिहिली व शके १२१८ मध्ये जिवंत समाधि घेतली. त्यांचा जन्म ११९३ मध्ये झाला. म्हणजे त्यांचे आयुष्य अवघे २५ वर्षांचे होते.

## संत व स्वराज्य स्थापना

संतांच्या जीवनात ज्यांना गोडी वाटते त्यांची मनोवृत्ति चमत्कारप्रिय असते व त्यामुळे बहुतेक संतांची चरित्रे भाकड कथांनी भरलेली आहेत. ही चमत्कारप्रियता या थराला जाते की ज्या गोष्टी चमत्कारस्वरूपाच्या मुळीच नाहीत त्या देखील संतभक्तांना चमत्कारपूर्ण वाटतात. ज्ञानेश्वरांनी अवघ्या २५ वर्षांच्या आयुष्यात ज्ञानेश्वरी, अमृतानुभव, चांगदेवपासष्टी, स्फुट अभंग व पदे इतकी मोलाची ग्रंथरचना केली ही देखील

संतभक्तांच्या मते चमत्कारात मोडण्यासारखे आहे. वस्तुत: यात काहीही चमत्कार नाही. प्रतिभाशाली पुरुषांच्या कार्याचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की त्यांच्या सर्वोत्कृष्ट कृति तिशीच्या आतच निर्माण झालेल्या आहेत. न्यूटनने तेविसाव्या वर्षी द्विवर्ण सिद्धांताचा म्हणजे बायनॉमियल थिअरमचा व शून्यालब्धचा म्हणजे कॅल्क्युलसचा शोध लावला. २५ व्या वर्षीच शेक्सपीअर नाटककार म्हणून प्रसिद्धीस आला होता. विष्णुशास्त्री चिपळूणकर वयाच्या पंचवीसाव्या वर्षीच निबंधमालेचे लेखक म्हणून गाजू लागले होते.

राम शेवाळकरांनी ज्ञानेश्वरीची महती वर्णन करताना जी अवतरणे दिली आहेत त्यावरून उपमादृष्टांत देण्यात ज्ञानेश्वर कालिदासाच्या तोडीचे होते असे नि:संशय म्हणावेसे वाटते.

ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी यांचे विवेचन करताना राम शेवाळकर अनायासेच संतांच्या एकूण कार्याचे मूल्यमापन काय करावे या प्रश्नावर थडकले आहेत. याबाबतीत राजवाडे व केतकर यांची संतविरोधी मते फारच गाजली आहेत. राजवाडे संतांचे कार्य सामाजिकदृष्ट्या निरुपयोगी मानून त्यांना देशबुडवे, टाळकुटे वगैरे पदव्या बहाल करतात. डॉ. श्री. व्यं. केतकर संताचे साहित्य साहित्य या दृष्टिने मोलाचे आहे हे देखिल कबूल करीत नाही हे सर्व साहित्य जाळून टाकले तरी मराठी वाङ्मयाचे काहीही नुकसान होणार नाही असे त्यांनी उद्‌गार काढलेले आहेत.

याच्या उलट रानडे व त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून न.र. फाटक संतांनी महनीय सामाजिक कार्य केले आहे असे प्रतिपादन करतात. राजवाडे शिवाजीच्या क्रान्तिकार्याचे स्फूर्तिस्थान म्हणून रामदासाकडे पाहतात पण इतर साऱ्या संतांना देशबुडवे ठरवितात. रानडे संतांचे कार्य ही शिवाजीच्या कार्याची पूर्वतयारी होती असे प्रतिपादन करतात. न. र. फाटक इस्लामी आक्रमणाला तोंड देण्यासाठी ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली असे प्रतिपादतात. राम शेवाळकर हे रानडे व न. र. फाटक यांच्या पक्षाचे आहेत. इस्लामी आक्रमणाला तोंड देण्यासाठी ज्ञानेश्वरी लिहिली असे ते म्हणू पावत नाहीत. पण तरी ज्ञानेश्वरांनी मोठे समाजकार्य केले असे त्यांचे मत आहे.

ज्ञानेश्वरी इस्लामी आक्रमणाला विरोध करण्यासाठी लिहिली गेली हे न.र. फाटकांचे मत त्यांच्या १८५७ वरील मताप्रमाणेच 'खोटे बोलीन, संपूर्ण खोटे बोलीन व खोट्याशिवाय काही बोलणार नाही' या प्रतिज्ञेचे स्मरण करून देणारे आहे. ज्ञानेश्वरीत इस्लाम व इस्लामी आक्रमण यांच्याबद्दल चकार शब्दही नाही. ज्ञानेश्वरी इसवी सन १२९० मध्ये पूर्ण झाली व त्यानंतर चारच वर्षांनी अल्लाउद्दीन खिलजीने महाराष्ट्राचे स्वराज्य गिळंकृत केले. या आक्रमणाला परतविण्यासाठी ज्ञानेश्वरांनी आपल्या योगसामर्थ्याचा उपयोग केला नाही उलट आता आपल्याला आता जीवनात काही करायचे उरलेच नाही म्हणून जिवंत समाधी घेतली ? ज्ञानेश्वर व ज्ञानेश्वरी परकीय आक्रमणाशी काही संबंध नाही असे म्हणणे वडाची साल पिंपळाला लावण्यासारखे आहे.

## संतांचे समाजकार्य

संतांनी जे समाजकार्य केले असे सांगण्यात येते त्याचे स्वरूप असे आहे.

१)संतांनी संस्कृतचे बंड मोडून काढून लोकभाषेत ग्रंथरचना केली व ज्ञानाचे दार सर्व जनतेसाठी खुले केले.

२) संतांनी जातिव्यवस्थेविरुद्ध बंड करून समतेचा संदेश दिला.

३) संतांनी स्वधर्माबद्दल अभिमान जागृत करून इस्लामी आक्रमणाला तोंड देण्यास मदत केली.

हे तीन्ही दावे पुराव्यापुढे टिकणारे नाहीत. संतांच्या पूर्वी सारी ग्रंथरचना संस्कृतमध्ये होत असे व संतांनी प्रथम लोकभाषेचा ग्रंथरचनेसाठी वापर करण्यास सुरुवात केली ही समजूत निराधार आहे. साधारणपणे बुद्धाच्या काळापासून संस्कृत ही जनसामान्यांची बोलभाषा उरली नव्हती, आपण तेव्हापासूनच लोकभाषेत ग्रंथरचनेस सुरुवात झाली. बौद्धांचे प्रारंभीचे वाङ्मय पालीत आहे. जैनांचे देखील अर्धमागधी वगैरे प्राकृतात आहे. 'गाथासप्तशती' हा दोन हजार पूर्वी संकलित केला गेलेला लौकिक कवनांचा संग्रह महाराष्ट्री प्राकृतात आहे. बहुत्कथा हा मूलत: प्राकृतात लिहिलेला प्रचंड ग्रंथ होता. गुप्तांच्या व हर्षाच्या काळात प्राकृतमध्ये ग्रंथरचना होत होती हे सेतुबंध हे महाराष्ट्रीय

प्राकृतातील उत्कृष्ट काव्य व बाणभट्टाने केलेला भाषाकवींचा उल्लेख यावरून स्पष्ट आहे. राजपूत काळात बोलभाषात रचना करण्याची प्रवृत्ति मोठ्या प्रमाणात दिसून येते. पृथ्वीराज रासो हे चन्दबरदाईचे काव्य हिंदीत आहे. साधारणपणे असे म्हणता येईल की फक्त संस्कृतात ग्रंथरचना होत होती व बोलीभाषेत होतच नव्हती असा कोणताच काळ भारताच्या इतिहासात नव्हता.

यावरून संतांनी ज्ञानाचे द्वार जनसामान्यांत खुले केले हा दावा गळून पडतो. शूद्रांना वेदाध्यनाची बंदी होती याचा बराच गाजावाजा करून जनसामान्यांना शिक्षणापासून वंचित ठेवण्यात आले असा कांगावा करण्यात येतो. पण वेदाध्ययन म्हणजे वेदांचे अर्थशून्य पाठांतर. या विद्येपासून वंचित राहिल्याने मनुष्य ज्ञानापासून वंचित होतो ही समजूत विचित्र आहे. शल्यचिकित्सा, आवास निर्माण वगैरे आजकाल खोऱ्याने पैसे मिळून देणाऱ्या विद्या या खास क्षेत्रातल्या होत्या. संतांनी ज्या ज्ञानाचे द्वार जनतेसाठी खुले केले असे सांगण्यात येते ते ज्ञान म्हणजे वेदांताचे ज्ञान. ज्ञानेश्वरांनी गीतेवर भाष्य लिहिले व एकनाथांनी भागवताच्या दशस्कंधावर टीका लिहिली. दासोपंतांचा लक्ष श्लोकांचा गीतार्णव प्रसिद्ध आहे. पण ज्याकाळी प्राकृतामध्ये प्रचूर ग्रंथरचना होत होती त्या संतपूर्व काळात गीता व भागवत हे ग्रंथ प्राकृतांनी वर्ज्य ठरविले होते असे समजणे बरोबर नाही.

संतांनी जातिप्रथेला विरोध केला हा शुद्ध भ्रम आहे. जातीला महत्व नाही हे संतांचे प्रतिपादन फक्त अध्यात्मक्षेत्रापुरते अभिप्रेत आहे. ज्ञानेश्वरांनी शुद्रांबद्दल काढलेले अनुद्गार उद्गार स्वत: राम शेवाळकरांनीच उद्‌धृत केलेले आहेत. ते उपमा दृष्टांतांच्या स्वरूपाचे आहेत असे शेवाळकर स्पष्टीकरण देतात, पण अध्यात्माव्यतिरिक्त क्षेत्रात संतांनी जातपात मानली नाही हे खरे नाही. एकनाथांनी अंत्यजांना श्राद्धाचे अन्न खाऊ घातले याचे कारण अंत्यजांची वासना त्यावर गेल्यामुळे ते अन्न विटाळले अशी एकनाथांची समजूत होती असे बाळशास्त्री हरदास स्पष्टीकरण देतात. 'समाजप्रबोधन' मासिकाने या विषयावर एक परिसंवाद घडवून आणला होता व त्याचा निष्कर्ष सतांनी जातपात मोडण्यास मदत केली ही समजूत अनैतिहासिक आहे असाच होता.

संतांच्या भक्तीच्या प्रसारामुळे लोकांचे स्वधर्मप्रेम वाढले हीही कल्पना अतिरंजित आहे. एकनाथांचा हिन्दूसंवाद हा एकमात्र अपवाद सोडल्यास साऱ्या संतवाङ्मयात इस्लामच्या हल्ल्याला प्रत्युत्तर कुठेही सापडत नाही.

### भक्तीला सामाजिक आशय नाही

संतांना कोणत्याही सामाजिक सुधारणेचे श्रेय देण्यापूर्वी भक्ति, त्यामागील भावना व विचार यात कोणताही सामाजिक आशय नाही हे लक्षात घेतले पाहिजे. भक्तीमुळे संतांच्या त्यांच्या कुटुंबाला भोगाव्या लागलेल्या आपत्तींकडे बोट दाखवून भक्ति हे दारुसारखेच एक व्यसन आहे असा आरोप केला की भक्तीचे समर्थक देशभक्ताच्या त्यागामुळे त्याच्यावर व त्याच्या कुटुंबियांवर ओढवलेल्या आपत्तींचे उदाहरण देऊन भक्ति ही दारूच्या व्यसनासारखी नसून देशभक्तीसारखी महान भावना आहे असे प्रतिपादन करीत असतात. पण देशभक्ति या भावनेला सामाजिक आशय आहे. देशाचे म्हणजे देशातील समाजाचे व त्याच्या नागरिकांचे भले व्हावे यासाठी देशभक्त त्याग करीत असतो. त्यामुळे देशभक्तीमुळे ओढवलेल्या आपत्ती या देशभक्तीमुळे होऊ शकणाऱ्या समाजकल्याणाचे मूल्य आहे असे म्हणता येते.

पण ईश्वरभक्तीला सामाजिक आशयच नाही. भक्ति आत्मकल्याणाच्या हेतूने केली जाते. यावर कधीकधी 'हेची दान देगा देवा तुझा विसर न व्हावा' इत्यादि वचने उदधृत करुन संतांनी आत्मकल्याणासाठी भक्ति केली नसून भक्ति हे स्वयमेव मूल्य मानले असे उत्तर देण्यात येत असते. पण भक्ति हे आत्मकल्याणाचे साधन न मानता स्वयमेव मूल्य मानले तरी तिला सामाजिक आशय नाही हा आरोप उरतो. दारूड्या दारूच्या आनंदासाठी दारु पीत असतो, त्याला दारु पिऊन दुसरे काही साधायचे नसते. मद्यपानाच्या आनंदाला सामाजिक आशय नाही. एकट्याने दारू न पीता दारूड्याला दुसऱ्यांच्या बरोबर दारू प्यावीशी वाटते व त्यामुळे दारूला सामाजिक आशय आहे असे म्हटले जाते. 'मेल बनाती मधुशाला' असे बच्चन यांच्या प्रसिद्ध 'मधुशालेत' वचन आहे. या तऱ्हेचा सामाजिक आशय भक्तीलाही आहे. एकट्याने भक्ति न करता सामुहीकरीत्या टाळ कुटल्याने भक्तीचा उन्माद द्विगुणित होतो. पण या तऱ्हेच्या सामाजिक आशयाने समाजाचे भले होत नसते. भक्तीचा सामाजिक आशय असलाच तर दारूच्या अफूच्या सामाजिक आशयासारखा आहे. त्यामुळे भक्तीच्या चळवळीमुळे शिवाजीचा उदय झाला. स्वराज्याची बीजे रोवली गेली, धर्माचे रक्षण झाले वगैरे भरमसाट दावे अत्यंत हास्यास्पद आहेत.

राम शेवाळकर यांनी प्रेमपूर्वक भेट म्हणून दिलेल्या दोन ग्रंथांचे वाचन करुन मला जे विचार सुचले यातले काही वर नमूद केले आहेत. हे विचार जमेस धरूनही राम शेवाळकरांचे ग्रंथ त्यांच्या वक्तृत्वाप्रमाणेच रंजक आहेत हे सांगणे आवश्यक आहे.

❀ ❀ ❀